Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/मु.वि.मं./१०वीपरीक्षा/3574
दिनांक :०५/१०/२०२६
06 OCT 2026

प्रति,
मुख्याध्यापक/संपर्क केंद्र प्रमुख,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय: महाराष्ट्र राज्य मुक्त विदयालय मंडळाच्या इयत्ता ५वी व ८ वी साठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज प्रक्रियेबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरुन सोबत असलेल्या प्रकटनान्वये महाराष्ट्र राज्य मुक्त विदयालय मंडळाच्या इयत्ता ५वी व ८ वी साठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज प्रक्रियेबाबत कार्यवाही करणेत यावी.

(गजानन उकिर्डे)
प्र. विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे ४११००४

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामध्ये प्राथमिक स्तर (इ.५वी) व उच्च प्राथमिक स्तर (इ.८वी) परीक्षेसाठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांवनोंदणी अर्ज दि. ०५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहेत.

उपरोक्त ऑनलाईन नांवनोंदणी अर्ज भरण्याचा व कागदपत्रे स्विकारण्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | ऑनलाईन पध्दतीने नांवनोंदणी अर्ज स्विकारण्यासाठीचा दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | दि. ०५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नांवनोंदणी अर्ज भरणे |
| २ | दि. २२/१०/२०२६ ते दि. ३०/१०/२०२६ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये जमा करणे. |
| ३ | दि. ०२/११/२०२६ | संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे |

तरी उपरोक्त तक्त्यात नमूद कालावधीमध्ये मुक्त विद्यालय मंडळाच्या इ.५वी व इ.८वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी http://msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

(अर्ज भरण्याबाबतच्या आवश्यक सुचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्या वाचून अर्ज भरण्यास सुरवात करावी)

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.